16 MAR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात सभ्यता, सुसंस्कृततेचा संगम

## विजय कुवळेकर : शिवाजी विद्यापीठात डॉ. आनंद पाटील यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** सभ्यता, सुसंस्कृतता आणि अभिजातता यांचा तिहेरी संगम यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळतो. त्याचे प्रतिबिंब 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' या ग्रंथात पानोपानी आढळते, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक आणि राज्याचे माजी माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि येथील आनंद ग्रंथसागर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' या डॉ. आनंद पाटील यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झाला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्राने राज्यापुरते संकुचित करून ठेवले, हे दुर्दैव असून त्या विचारसरणीतून बाहेर काढणारा हा एक वेगळा वाङ्मयीन चरित्रग्रंथ असल्याचे सांगून कुवळेकर म्हणाले, राष्ट्रीय पातळीवरील असामान्य नेत्याचे विचारचरित्र या ग्रंथाच्या माध्यमातून साकारले आहे. आजकाल वाचणारे नेते कमी होत आहेत. साऱ्यांनाच यशाचे शॉर्टकट हवे आहेत. सभ्यता, सुसंस्कृतपणाची पातळी खालावते आहे. या पार्श्वभूमीवर स्वखर्चाने आठ हजारांहून अधिक ग्रंथ खरेदी करून त्यांचे वाचन करणारा आणि त्यातून प्राप्त ज्ञानाचा आपल्या राष्ट्रासाठी वापर करणारा यशवंतरावांसारखा दुर्मीळ नेता आपल्याला लाभला. यशवंतरावांनी मोठमोठी पदे भूषविली, त्यातून ते आर्थिकदृष्ट्या श्रीमंत झाले नाहीत; तथापि, वाचनामुळे ते वैचारिक आणि तत्त्वज्ञानदृष्ट्या मात्र अत्यंत समृद्ध झाले.

ग्रंथातून वाचलेले तत्त्वज्ञान आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा प्रयत्न करणारा नेता म्हणजे यशवंतराव. कुणब्याचा पोर ते देशाचा उपपंतप्रधान अशी मजल मारणाऱ्या यशवंतरावांची मुळे मातीत घट्ट रोवलेली होती. सातत्यपूर्ण वाचनामुळेच यशवंतरावांच्या प्रतिपादनात कधीही पुनरावृत्ती आढळत नाही. वाचनानेच यशवंतरावांसारखा निष्कलंक चारित्र्याचा पारदर्शक आणि निखळ माणूस घडला.



कोल्हापूर : 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' या ग्रंथाचे प्रकाशन करताना पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विजय कुवळेकर यांच्यासह अण्णासाहेब चव्हाण, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आनंद पाटील आणि डॉ. जे. एफ. पाटील.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, अप्रतिम वक्तृत्व आणि अफाट वाचन असणाऱ्या यशवंतरावांची कामगिरी अतुलनीय आहे. त्यांच्यापूर्वी आणि नंतरही असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व महाराष्ट्रात निर्माण झाले नाही, होणार नाही.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, महाराष्ट्राच्या प्रगतीचे यशवंतराव चव्हाण शिल्पकार होते. नीतीमूल्यांबद्दल अत्यंत आग्रही असणाऱ्या या नेत्याने तितक्याच सचोटीने विविध क्षेत्रांत कार्य केले आणि त्या कार्याचा स्वतंत्र ठसा उमटविला. ग्रंथवाचनाने माणूस मोठा नव्हे, तर शहाणा निश्चित होतो, असे मानणाऱ्यांपैकी ते होते. अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, लेखक डॉ. आनंद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अध्यासनाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी आभार मानले. डॉ. आण्णासाहेब चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे यांच्यासह शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

16 MAR 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दुसऱ्याचं जगणं समृद्ध करण्यातच आनंद

## – इंद्रजित देशमुख



**कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख. यावेळी डावीकडून प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, डॉ. विलास नांदवडेकर, सचिन मेनन आदी.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

तथाकथित सुखाच्या संकल्पनेला छेद देत आपल्या आचार, विचार व कृतीने इतरांचं जगणं समृद्ध करीत राहण्यातच खरा आनंद असतो, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी बुधवारी केले. ते केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योगभूषण शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत ते 'आनंदाचे आवारू मांडू जगा' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

इंद्रजित देशमुख म्हणाले, आपल्या जगण्यातला आनंद नेमका कशात आहे हेच समजत नसल्याने आपण तथाकथित सुखाच्या संकल्पनेत अडकलो आहोत. आपल्या जन्माचे प्रयोजन आपण विसरलो आहोत. त्यामुळे जीवन दुःखी झाले आहे. स्वतःसाठी जगणाऱ्यांना लोक कालांतराने विसरतात; पण जे इतरांसाठी जगतात ते आनंदी तर होतातच, त्यासह इतरांचंही जगणं समृद्ध करतात. त्यांचे स्मरण केले जाते. विश्वाला कुंपण घालून त्यातील सर्वांसाठी आनंद निर्माण करायचा आहे, अशा वृत्तीने जगायला हवे. एका चेहऱ्याने जगायला सुरुवात केली की हसता येते, आनंदी राहता येते. सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा, मान या गोष्टींपेक्षा इतरांचं जगणं समृद्ध करण्यासाठी धडपडल्यास त्यातून मिळणारे सुख चिरकाल टिकणारे असेल. जीवनातल्या प्रत्येक क्षणी आनंद आपल्या बाजूला असल्याचे जाणवेल. फक्त तो पाहण्याची दृष्टी विकसित करावी लागेल.

केआयटीचे अध्यक्ष सचिन मेनन म्हणाले, स्वतःच्या उन्नतीसाठी जगणारे आयुष्यात नेहमी निराश असतात, परंतु इतरांसाठी जगणारे आदर्शवत ठरतात. शिवाजीराव देसाई यांनी व्यवसायाइतकंच प्रेम व वेळ देऊन संस्थेची उभारणी केली. प्रा. अक्षय थोरवत यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांनी स्वागत केले.

16 MAR 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हळव्या व्यक्तिमत्त्वाचे कठोर प्रशासक!

**शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. द. ना. धनागरे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यातील शास्त्रज्ञाला, भाषेच्या उत्कृष्ट जाणकाराला, कठोर प्रशासकाला आणि हळव्या व्यक्तिमत्त्वाला त्यांना मुलीसमान असलेल्या विद्यार्थिनीने वाहिलेली हृद्य आदरांजली.**

- प्रा. सौ. अल्पना कुलकर्णी



प्रा. दत्तात्रय धनागरे

प्रा. दत्तात्रय नारायण धनागरे हे हाडाचे शिक्षक. शेतकऱ्यांच्या चळवळीविषयी अभ्यास करणारे समाजशास्त्रज्ञ, उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पद भूषवणारे एक कुशल व कठोर प्रशासक, संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांवर प्रभुत्व असणारे भाषाशास्त्राचे गाढे अभ्यासक, उत्तम वक्ता असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. त्यांच्या या सर्व गुणांचा अनुभव सातत्याने २० वर्षे मला घेता आला.

धनागरे सर १९९५ मध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले. त्या वेळी मी शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्रामध्ये एमएस्सी करत होते. त्या वेळी विभागातील स्वागत समारंभानिमित्त ते आले होते. त्यांच्या वक्तृत्वाने आम्हास प्रेरणा मिळाली. त्यांची भाषण करण्याची पद्धत, भाषेवरील प्रभुत्वाने आम्ही प्रभावित झालो. माझे मामा प्रा. गुरुनाथ नाडगोंडे हे समाजशास्त्र विषयात संशोधक असल्याने त्यांच्याकडूनही मला सरांच्या समाजशास्त्र विषयातील कार्याबद्दल माहिती मिळत असे. त्या दोन वर्षांत विद्यापीठात अथवा कोल्हापूर शहरात झालेल्या विविध कार्यक्रम, व्याख्यानांतून सर आम्हाला उमजत गेले. त्यानंतर माझे पती शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर शिक्षण केंद्रात अधिव्याख्याता पदावर रुजू झाले. त्यामुळे कुलगुरू या नात्याने सर जेव्हा सोलापूरला येत तेव्हा त्यांची भेट होई. त्यांच्या पत्नी सौ. निशा यांच्याशी स्नेहबंध जुळले. सरांचे सोलापूरच्या पदव्युत्तर शिक्षण केंद्रावर फार लक्ष असे. त्यांनी या विभागाचा विकास केला.

ऑक्टोबर २००० मध्ये सर निवृत्त झाले; परंतु त्यानंतरही व्याख्याने, पुस्तक प्रकाशने अशा निमित्ताने ते सोलापुरात येत तेव्हा आवर्जून भेटत-बोलत. या भेटींमधून कठोर प्रशासकामध्ये लपलेला एक हळवा माणूस भेटत गेला आणि त्यांच्यात व माझ्यात वडील व मुलीचे नाते दृढ झाले. जेव्हा जेव्हा भेट होई तेव्हा विविध विषयांवर चर्चा झडत. माझ्या संपूर्ण कुटुंबाची आवर्जून चौकशी करत. काही वर्षांपूर्वी त्यांच्या अर्धांगिनी सौ. निशा यांची त्यांनी आजारपणात सेवा केली; मात्र त्या त्यामधून वाचू शकल्या नाहीत. त्यांच्या जाण्याने सर हळवे बनले. तरीही त्यांचा व्यासंग सुरूच राहिला. सहा महिन्यांपूर्वीच त्यांची मुंबईतील एशियाटिक सोसायटीच्या विश्वस्तपदी निवड झाल्यावर बैठकीसाठी ते मुंबईत आले असता आवर्जून घरी आले. मला दूरचित्रवाहिनीवर एका कार्यक्रमात पाहिल्यानंतर तातडीने दूरध्वनीवरून मला शुभेच्छा दिल्या, माझे कौतुक केले. त्यांच्यासोबतच्या संवादातून मलाही भाषेतील बारकावे समजले. समाजशास्त्र उमगण्यास मदत झाली. सरांच्या जाण्याने मनात पोरकेपणाची भावना तयार झाली आहे.


16 MAR 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण निष्कलंक नेते

## डॉ. डी. वाय. पाटील : आनंद पाटील लिखित पुस्तकाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : "अफाट वाचनाच्या बळावर ज्ञान आत्मसात करणारा निष्कलंक नेता म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे स्थान मोलाचे आहे, असे प्रतिपादन बिहारचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र व आनंद ग्रंथसागर प्रकाशनतर्फे गोवा विद्यापीठाचे माजी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आनंद पाटील लिखित 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांच्या उपस्थितीत सोहळा झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मंगळवारी 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष यशवंतराव चव्हाण' या पुस्तक प्रकाशनप्रसंगी डावीकडून आण्णासाहेब चव्हाण, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. देवानंद शिंदे, विजय कुवळेकर, आनंद पाटील, डॉ. जे. एफ. पाटील.**

डॉ. आनंद पाटील म्हणाले, "यशवंतराव चव्हाण यांनी क्रमिक पुस्तकांपासून खंडापर्यंत पुस्तकांशी मैत्री केली. जवळपास ८ हजार पुस्तके त्यांच्या संग्रही होती. पुस्तक माणसाला ज्ञानवंत बनवितात, हीच बाब त्यांनी कृतीतून खरी केली. त्यामुळे केवळ राजकारणाचे नव्हे तर समाजकारण, साहित्य, लोकसाहित्यापासून ते संस्कृती, विज्ञानापर्यंत प्रत्येक विषयाची जाण त्यांना होती. या साऱ्याचा सुरेख वापर करून यशाची एकेक शिखरे पादाक्रांत करीत ते उपपंतप्रधान पदापर्यंत पोचले. त्यांच्यातील प्रत्येक छटा पुस्तकाद्वारे वाचकांसमोर आणल्या आहेत."

कुवळेकर म्हणाले, "लहानपणाकडून महानपणाकडे जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणून यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख करावा लागेल. ते काही वेळा आक्रमक होत असत. पण त्यांनी आक्रस्ताळेपणा कधीही केला नाही. व्यक्तिगत व सार्वजनिक आयुष्यात त्यांनी सभ्यता, वस्तुनिष्ठता आणि निष्ठाही कायम जपली."

डॉ. शिंदे म्हणाले, "कष्टकऱ्यांचे जगणे समृद्ध होण्यासाठी शिक्षणाची कवाडे खुली झाली पाहिजेत, अशी महत्त्वपूर्ण भूमिका यशवंतराव चव्हाण यांनी घेतली. त्यामुळेच कष्टकरी वर्गातील मुलांच्या पिढ्या शिक्षित, उच्चशिक्षित होऊ शकल्या आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी आनंद पाटील यांनी लिहिलेले पुस्तक नव्या पिढीला मार्गदर्शक ठरेल."

या वेळी डॉ. जे. एफ. पाटील, कुलसचिव विलास नांदवडेकर, अण्णासाहेब चव्हाण आदी उपस्थित होते.

16 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परदेशी विद्यार्थ्यांनी 'सदिच्छा दूत' बनावे

## महंमद अली ओस्मान; विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थी परिषद

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांनी आपल्या देशात परतल्यानंतर या विद्यापीठाचे, भारतीय उच्च शिक्षणाचे 'सदिच्छा दूत' (ब्रँड ॲम्बॅसडर) बनावे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील केनिया हायकमिशनचे एज्युकेशन कौन्सेलर महंमद अली ओस्मान यांनी केले.



आंतरराष्ट्रीय विद्यार्थी परिषदेवेळी केनिया हायकमिशनचे एज्युकेशन कौन्सेलर महंमद अली ओस्मान यांचे स्वागत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. यावेळी शेजारी डॉ. पी. एस. पाटील, डॉ. मेघा पानसरे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स कक्षातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय विद्यार्थी परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. ओस्मान म्हणाले, शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांची संख्या इतकी असेल, याची कल्पना नव्हती. या परिसरातील शिक्षणाची परंपरा आणि आस्था पाहून मी भारावून गेलो आहे. शिवाजी विद्यापीठासह एकूणच भारतीय उच्च शिक्षणाच्या परंपरेबद्दल माझ्या मनात आदराचे स्थान निर्माण झाले आहे. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, हे सारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाचे ब्रँड ॲम्बॅसडर आहेत; पण त्याचबरोबर स्थानिक पालक या नात्याने त्यांच्याशी सुसंवादाचा पूल प्रस्थापित करावा. या परिषदेत आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. (प्रतिनिधी)

### विविध देशांतील ५४ विद्यार्थी सहभागी

या परिषदेत केनिया, झांबिया, बुरुंडी, टांझानिया, युगांडा, दक्षिण सुदान, सोमालिया आणि सुदान, आदी देशांतील आणि विद्यापीठाच्या परिक्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विविध देशांमधील ५४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 MAR 2017 पुढारी

# यशवंतराव चव्हाण यांच्याकडून ज्ञानाचा राष्ट्रासाठी वापर

## विजय कुवळेकर; 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' ग्रंथाचे प्रकाशन



**कोल्हापूर : 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' या ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी माजी राज्यपाल डॉ. डी. वाय.पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, अण्णासाहेब चव्हाण, प्रा. डॉ. विलास नांदवडेकर, विजय कुवळेकर, प्रा. डॉ. आनंद पाटील, डॉ. जे. एफ. पाटील आदी. (छाया : तय्यब अली)**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजकाल वाचणारे नेते कमी होत आहेत. साऱ्यांनाच यशाचे शॉर्टकट हवे आहेत. सभ्यता, सुसंस्कृतपणाची पातळी खालावत चालली आहे. स्वखर्चाने आठ हजारांहून अधिक ग्रंथ खरेदी करून त्याच्या वाचनातून प्राप्त ज्ञानाचा राष्ट्रासाठी वापर करणारा यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा दुर्मीळ नेता महाराष्ट्राला लाभला हे भाग्यच आहे, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ साहित्यिक व राज्याचे माजी माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन व आनंद ग्रंथसागर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' या डॉ. आनंद पाटील लिखित ग्रंथाचा प्रकाशन सोहळा विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी माजी राज्यपाल डॉ. डी.वाय. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. कुवळेकर म्हणाले, 'यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्रापुरते संकुचित करून ठेवले हे दुर्दैव असून त्या विचारसरणीतून बाहेर काढणारा हा एक वेगळा वाङ्‌मयीन चरित्रग्रंथ आहे. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, वक्तृत्व व अफाट वाचन असणाऱ्या यशवंतरावांची कामगिरी अतुलनीय आहे. त्यांच्यापूर्वी आणि नंतरही असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व महाराष्ट्रात निर्माण झाले नाही, होणार नाही.' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'महाराष्ट्राच्या प्रगतीचे यशवंतराव चव्हाण शिल्पकार होते. यावेळी डॉ. जे. एफ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. लेखक डॉ. आनंद पाटील यांनी ग्रंथाबद्दल माहिती दिली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. डॉ. ए. एम. गुरव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अण्णासाहेब चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे उपस्थित होते.

16 MAR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ : नव्या कायद्यानुसार पदांच्या नियुक्ती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात नव्या विद्यापीठ कायद्यानुसार तात्पुरत्या कालावधीसाठी पुढील आदेश येईपर्यंत पदांच्या नियुक्ती बुधवारी करण्यात आल्या. यानुसार विशेष कार्य अधिकारी म्हणून डॉ. डी. टी. शिर्के, सामाजिक शास्त्रे समन्वयक डॉ. वासंती रासम, विज्ञान व तंत्रज्ञान समन्वयक डॉ. पी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, तसेच आंतरविद्याशाखीय समन्वयक म्हणून डॉ. पी. डी. राऊत यांची नियुक्ती प्रशासनाच्या वतीने करण्यात आली. पुढील आदेश येईपर्यंत या नियुक्तीनुसार प्रशासकीय कामकाज केले जाणार आहे.

16 MAR 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ विशेष कार्य अधिकारीपदी शिर्के

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कार्य अधिकारीपदी प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची, तर विविध विद्याशाखांच्या समन्वयकपदी डॉ. वासंती रासम, पी. एस. पाटील, ए. एम. गुरव आणि पी. डी. राऊत यांची नियुक्ती बुधवारी विद्यापीठ प्रशासनाने केली.

शासनाच्या सूचनेनुसार सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या समन्वयकपदी प्रा. रासम, विज्ञान व तंत्रज्ञानसाठी डॉ. पाटील, वाणिज्य आणि व्यवस्थापनकरिता डॉ. गुरव आणि आंतरविद्याशाखीयकरिता डॉ. राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यासह विशेष कार्य अधिकारीपदी डॉ. शिर्के यांची नियुक्ती केली आहे. डॉ. पाटील हे स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक, डॉ. गुरव हे वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख, तर डॉ. राऊत हे पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख आहेत. डॉ. शिर्के हे संख्याशास्त्रात कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 MAR 2017

Times of India

# Universities to post research topics on websites

Swati Shinde Gole
@timesgroup.com

**Pune:** The University Grants Commission has ordered all universities across the country to upload the research topic of every post-doctoral scholar on their websites to stop duplication.

Savitribai Phule Pune University (SPPU) will declare the topics of its research scholars in a month. So far, there was lack of a collective database of research undertaken by scholars which often resulted in repetition.

The commission, in its 521st meeting on February 22, decided to inform the universities to upload the data on specific parameters including name, department, mode of degree, research topic, likely date of completion and the funding agency, among others.

It was also decided that University Grants Commission should maintain a defaulters' list on its website if universities failed to upload the data.

SPPU has over 800 affiliated colleges from Pune, Ahmednagar and Nashik, making it the second-largest university system in the country. There are nearly 50 on-campus postgraduate departments under 11 faculties.

Close to 1,000 candidates register for PhD and around 400 for MPhil degrees every year. Of these, about 70 to 80 special candidates apply for the respective degrees at the university annually.

The university had initiated a research portal to track the status of the theses of scholars in 2015. Over 350 students secure doctorates every year from the university.

Registrar Narendra Kadu said, "There are many faculty members in different departments of the university who are conducting research at their own levels. But many do not know the topics the others are working on. A summary of such work will also be put up on the portal. The system has been working well with the university, so far."

There is always a chance for duplication of topics which can be eliminated by uploading the information, he added.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2017

पुढारी

# पंचगंगा स्मशानभूमीतील रक्षा विद्यापीठातील झाडांसाठी देणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर शहरातील पंचगंगा स्मशानभूमीतील रक्षा शिवाजी विद्यापीठ परिसरात असणाऱ्या झाडांसाठी देण्यात येणार आहे.

नदीत रक्षा टाकणे बहुतांश बंद झाल्याने स्मशानभूमीत मोठ्या प्रमाणात रक्षा साठली आहे. त्यामुळे ही रक्षा महानगरपालिकेच्या उद्यानातील झाडांना वापरण्यात येते. आता शिवाजी विद्यापीठातील झाडांसाठीही रक्षा देण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
16 MAR 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रक्षेतून फुलणार विद्यापीठातील वृक्षराजी

प्रतिनिधी
कोल्हापूर

- पंचगंगा स्मशानभूमीतून वेळोवेळी करणार पुरवठा : महापालिकेचा पुढाकार
- शनिवारी पहिल्यांदा दोन डंपर रक्षा विद्यापीठाला पाठवणार

पंचगंगा स्मशानभूमीतील रक्षाकुंडात साचणाऱ्या रक्षेचा वापर आता शिवाजी विद्यापीठ परिसरातील वृक्षांना खत म्हणून केला जाणार आहे. रक्षेच्या मागणीचे पत्रही विद्यापीठाने महापालिकेला दिले आहे. महापालिका रक्षा मोफत देणार असून शनिवारी १७ रोजी पहिल्यांदा दोन डंपर रक्षा विद्यापीठला पाठविणार आहे.

पंचगंगा स्मशानभूमीमधील रक्षा यापूर्वी पंचगंगा नदीत विसर्जित केली जात होती. नदी प्रदूषण होऊ नये या उद्देशाने विविध सामाजिक संघटनांनी रक्षा विसर्जित न करता रक्षा कुंडामध्ये टाकण्याचे आवाहन केले. साठलेली रक्षा शेतकऱ्यांना शेतामध्ये खत म्हणून दिली जाते. संघटनांनी केलेल्या जनजागृतीमुळे नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांकडून मागणी कमी झाली आहे. परिणामी रक्षा कुंडामध्ये मोठ्या प्रमाणात रक्षा शिल्लक राहत आहे. महापालिकेने यावर उपाय म्हणून ही रक्षा शिवाजी विद्यापीठ परिसरातील वृक्षांना खत म्हणून घ्यावी, अशी विनंती विद्यापीठाकडे केली. यावर विद्यापीठ प्रशासनाने ही सकारात्मक निर्णय घेतला आहे. महापालिकेकडे ही रक्षा मोफत मिळण्याची मागणीचे पत्र दिले आहे. त्यानुसार महापालिका साठवलेली रक्षा विद्यापीठास वेळोवेळी देणार आहे.

### दोन डंपर रक्षा शिवाजी विद्यापीठाला देणार

कोल्हापुरातील नागरिकांकडून पंचगंगा नदी प्रदूषण होऊ नये म्हणून रक्षा थेट नदीत टाकणे बंद केले आहे. रक्षा कुंडातच शंभर टक्के रक्षा टाकली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांकडून रक्षेचा उठाव झाला नाही. त्यामुळे कुंडामध्ये रक्षा शिल्लक आहे. विद्यापीठ परिसरातील झाडांसाठी रक्षाचा वापर खात म्हणून केला जाणार आहे. शनिवारी रक्षा विद्यापीठाकडे पोहोच करणार असल्याची माहिती सहाय्यक आरोग्य निरीक्षक अरविंद कांबळे यांनी दिली.

### रक्षा कुंडसाठी जागेची कमतरता

स्मशानभूमीशेजारी रक्षा कुंड आहे. रक्षा साठवण्यासाठी ही जागा कमी पडत आहे. कुंडाबाहेर रक्षा साठवली जाते. ही रक्षा रस्त्यावर पसरत असून परिसरात कुंडासाठी अतिरिक्त जागेची आवश्यकता आहे. प्रशासनाकडून यासाठी त्वरीत कार्यवाही होणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2017
लोकमत

# विलास संगवे यांचे कार्य दीपस्तंभासारखे

## एस. एन. पवार : विद्यापीठात स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर : ज्ञानतपस्वी प्रा. डॉ. विलास संगवे यांचे समाजशास्त्र, संशोधनातील कार्य हे दीपस्तंभासारखे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार यांनी बुधवारी येथे केले.

विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातर्फे आयोजित प्रा. डॉ. विलास संगवे प्रथम स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्रा. पवार म्हणाले, डॉ. विलास संगवे हे शिवाजी विद्यापीठाला लाभलेले एक श्रेष्ठ विचारवंत होते. त्यांचे बौद्धिक, शैक्षणिक, संशोधन क्षेत्रातील कार्य हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे होते. त्यांच्या संशोधनाला जगमान्यता मिळालेली होती. जैन धर्माचे तत्त्वज्ञान जगाच्या पातळीवर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, प्रा. संगवे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान हे वाखाणण्यासारखे होते. अशा ज्ञानतपस्व्याकडून सर्वांनी प्रेरणा घेऊन स्वतः कार्यप्रवण झाले पाहिजे.

कार्यक्रमास प्रा. डॉ. निशा मुढे-पवार, प्रकाश कांबळे, विजय ककडे, आर. बी. पाटील, विजय मारुलकर, एस. एन. मोहिते, पी. एस. कांबळे, प्रल्हाद माने, उषा पाटील, अर्चना जगतकर, अर्जुन जाधव, आदी उपस्थित होते. समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. जगन कराडे यांनी स्वागत केले. प्रतिभा देसाई यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)